माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०५
जावक क्र. :- ९१६ दिनांक :- ५/०७/१९

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०४.०७.२०१९

१. अपिलकर्ता श्री किशोर बाजीराव तुपारे,
राहणार :- ४२५/२६, औद्योगिक वसाहत,
गुलटेकडी पुणे ४११०३७

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री किशोर बाजीराव तुपारे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री श्री किशोर बाजीराव तुपारे यांनी दिनांक २९/०४/२०१९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांचेकडे कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीमधील रस्ता, फूटपाथ व इतर ठिकाणी अतिक्रमणावर होणाऱ्या कार्यवाहीच्या प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती मिळावी व सन २०१७-१८, सन २०१८-१९ मधील झालेल्या कार्यवाही बाबतची माहिती मिळणेबाबत अर्ज केला होता.

जनमाहिती अधिकार तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी अपिलकर्ता यांस वरील माहितीचे एकूण ३२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ रू २.०० प्रमाणे एकूण र.रु.६४.०० रक्कमेचा भरणा केलेनंतर आपणास माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे दि.०७.०५.१९ रोजी ई-मेल द्वारे कळविले असल्याचे सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २९/०४/२०१९ | २८/०५/२०१९ | ०७/०५/२०१९ | ०८/०५/२०१९ | ०८/०५/२०१९ |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०७/०६/२०१९ | १२/०६/२०१९ | नाही | नाही | २५/०६/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :– दि. ०४/०७/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :– उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :– उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीमधील रस्ता, फूटपाथ व इतर ठिकाणी अतिक्रमणावर होणाऱ्या कार्यवाहीच्या प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती मिळावी व सन २०१७-१८, सन २०१८-१९ मधील झालेल्या कार्यवाही बाबतची माहिती मिळणेबाबत. | वरील माहितीचे एकूण ३२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ रू २.०० प्रमाणे एकूण र.रु.६४.०० रक्कमेचा भरणा केलेनंतर आपणास माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे दि.०७.०५.१९ रोजी ई-मेल द्वारे कळविले असल्याचे सांगितले. |

## विवेचन

अपिलकर्ता श्री किशोर बाजीराव तुपारे, यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक २९/०४/२०१९ रोजी अर्ज कार्यालयाकडे दाखल झाला. अपिलार्थी यांना त्यांच्या अर्जाचे उत्तर दि.०७.०५.१९ रोजी ई-मेल द्वारे देण्यात आले होते. तरी संबधित जनमाहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती दिली नाही असे अपिलकर्ता यांनी अपिल अर्जात उल्लेख केला आहे.

कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

## -: आदेश :-

अपिलकर्ता श्री किशोर बाजीराव तुपारे यांनी अर्जात उल्लेख केलेप्रमाणे सन २०१७-१८, २०१८-१९ चे अतिक्रमण कारवाई अहवाल देणेत आलेले आहे.

कार्यवाहीच्या प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती अपिलार्थी यांनी मागविली असून मा. जनमाहिती अधिकारी यांनी श्री किशोर बाजीराव तुपारे यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २३१ ची छायांकित प्रत उपलब्ध करून देणेत यावी.

प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

4/7/19

(रविंद्र घोरपडे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाण: ०४/०७/२०१९,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री किशोर बाजीराव तुपारे,
राहणार :- ४२५/२६, औद्योगिक वसाहत,
गुलटेकडी पुणे ४११०३७

२. श्री अशोक महाजन,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी.......